# मनभावन



अरूण वि.देशपांडे

**मनभावन**

Manbhavan

**अरूण वि.देशपांडे**

**ARUN V. DESHPANDE**

❁

**©अरूण वि.देशपांडे**

मो.नं.९८५०१७७३४२

email: arunvdeshapnde@gmail.com

❁

**प्रथमावृत्ती: २८ जून २०१४**

**महाकवी कालीदास दिन**

❁

**मुखपृष्ठ:**

सप्तर्षी डी.टी.पी.

❁

**मुद्रक**

किशोर तु.घुले

सप्तर्षी डी.टी.पी.

मंगळवेढा

❁

**सप्तर्षी प्रकाशन**

गट न.८४/२,

दामाजी कॉलेजच्या पाठीमागे, मंगळवेढा

जि.सोलापूर-४१३३०५

❁

**मूल्य: २० रूपये**

# मनभावन

(ई-कविता संग्रह)

**अरूण वि.देशपांडे**

**सप्तर्षी प्रकाशन,**
मंगळवेढा, जि.सोलापूर

रसिक मित्र हो,

तुमचा भरभरून प्रतिसाद

याच माझ्या लेखनाच्या प्रेरणा...!

'मनभावन' ई-कविता संग्रह

तुम्हालाच सानंद अर्पण ..

**अरूण वि. देशपांडे**

# संपादकाचे दोन शब्द

'सप्तर्षी प्रकाशन' ही ग्रामीण भागातील कवी, लेखक यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांना मराठी वाङमयाच्या समृद्ध परंपरेत समाविष्ट करण्याचा वसा घेतलेली संस्था. या संस्थेच्या माध्यमातून श्री.अरूण वि. देशपांडे यांचा 'मनभावन' हा अत्यंत हृदयस्पर्शी कवितांचा पहिलाच ई-कवितासंग्रह हा कविता संग्रह ई-बुकच्या माध्यमातून आमच्या आगामी वेबसाईटवर तसेच bookganga.com या पोर्टलवर उपलब्ध करून देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.

कवि कालीदास-दिनी- प्रकाशित होत असलेला ई-बुक स्वरूपातील कविता संग्रह 'मनभावन' वाचकांच्या पसंतीस नक्कीच उतरेल या त शंका नाही.

**प्रकाशक**

# मनोगत

एक दिवस सप्तर्षी प्रकाशनाची स्टेट्स पोस्ट फेसबुकवर माझ्या वॉलवर आली आणि मी संपर्क साधला, अतिशय सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि माझ्या आणखी एक ई-बुकची तयारी सुरु झाली. हे माझे ६-वे ई-बुक आणि दुसरा ई-कविता संग्रह आहे.

सप्तर्षी प्रकाशनाचे श्री. किशोरजी घुले यांच्या सूचना आणि प्रतिसाद, हा इंटरनेट वरील जगास शोभणाऱ्या, म्हणजे, अतिशय वेगवान आणि कृतियुक्त अशा आहेत. मित्रांनो, भरपूर आणि सातत्यपूर्वक लेखनाची माझी सवय माझ्या कामास आली. गेल्या दोन-तीन वर्षात अनेक मासिक आणि दिवाळी अंकातून प्रकाशित झालेल्या माझ्या ४१ कविता या ई-संग्रहात समाविष्ट केल्या आहेत.

माझ्या कवितांना यथोचित प्रसिद्धी देणाऱ्या माझ्या सर्व संपादक स्नेह्यांचा मी ऋणी आहे. त्यांच्यामुळेच माझ्या कविता रसिकांच्या पर्यंत पोहचत आहेत. यापुढेही त्यांचा हा स्नेह-लोभ मला लाभणार आहेच, या ई-बुकच्या निमित्ताने या संपादक-मित्रांचे आभार मानतो.

माझ्या परिवारातील, माझी पत्नी-सौ.मिनाक्षी, मुलगा-चि.इंजि-अमित, सुनबाई-डॉ.सौ.ज्योती, कन्या- सौ.गौरी आणि जावाईबापू-श्री.आनंद रमेश असोदेकर आणि नात कु.नेत्रा, या सर्वांच्या कौतुकाने माझा लेखन-प्रवास चालू असतो हे सांगावेसे वाटते.

सप्तर्षी प्रकाशन आणि यांचे सर्व सहकारी मित्र यांच्या सहकार्यामुळे हा देखणा ई-कविता संग्रह 'मनभावन' आपल्यापर्यंत येतो आहे. या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद!

'महाकवी कालीदास-दिन' या विशेष दिवशी 'ई-कविता-संग्रह' येतो आहे.

रसिक हो, तुमचे अभिप्राय नेहमी प्रमाणे हवेच आहेत, जरूर कळवा.

**स्नेहांकित-**
**अरूण वि.देशपांडे**
**मो.९८५०१७७३४२**

**अरूण वि.देशपांडे**

अरूण विठ्ठलराव देशपांडे
बि.नं.सी-३, फ्लॅट नं.२,
शिवतरा गार्डन, गणंजय
सोसायटी जवळ, कोथरूड,
पुणे-३८, मोबा.९८५०१७७३४२

# साहित्यिक परिचय

## लेखक: अरूण वि.देशपांडे

**संपूर्ण नाव: अरूण विठ्ठलराव देशपांडे**

**जन्म दि. : ०८ ऑगष्ट १९५१**

**व्यवसाय: स्वेच्छानिवृत्त, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद (जून २००६)**

**लेखन आरंभ: १९८३-४८ पासून सातत्याने लेखन**

**लेखन प्रकार: १) कथा, कविता, समीक्षा, ललित, प्रासंगिक लेखन**
**२) बालकथा, बालकविता, बालकादंबरी, अनुवाद**

**प्रकाशित साहित्य: मार्च २०१३ पर्यंत एकूण ३६**

### मोठ्यांसाठी साहित्य: १४

१) कुरूप रंग २) रंग तरंग ३) अनुपमा
४) रंग फसवे ५) रंगपंचीविशी ६) नवऱ्यांची चाळ (विनोदी कथा)

**१) संत साहित्य:**

संतकवी दासगणू वाङमयदर्शन

**२) कविता संग्रह :**

१) गानेदिवाणे २) मन डोह

**३) ललित:** मनाच्या अंगणात

**४) नवसाक्षरांसाठी:**

१) संतवाणी २) अक्षर कळेल-संकट टळेल ३) जीवनाचा मंत्र ५) जीवनधारा

### बालसाहित्य: एकूण २२ पुस्तके

**अ) बालकथा**

**१.** बागुलबुवा **२.** पप्पू आणि गणु ढोल्या **३.** स्वावलंबन
४. सायलीची गोष्ट ५. बालवीर पप्पू आणि इतर गोष्टी ६. मोन्या
७. गीरीबाबांची गोष्ट ८. सोहमची गोष्ट ९. रेणूची गोष्ट

**ब) बालकादंबरी**

१) चंदर २) पप्पूची पत्रं ३) फुलपाखरू ४) बंटी

**क) बालकविता**

१.) गोड गोड चीकोबा २.) धांगडधिंगा मौजमस्ती

३.) माझा तिरंगा प्यारा ४.) आली आली परिराणी

**ड) व्यक्तिचित्रणे:**

१) पप्पूचा अल्बम

**इ) चरित्र:** संस्कार मूर्ती सानेगुरूजी

**ई) अनुवाद:**

१) मल्याळी बालकथा: श्रेष्ठ भारतीय बाल कथा (मल्याळी)

**उ) समीक्षा:** बालसाहित्य मराठवाड्याचे 'नव्यावाटा-नवे स्वरूप'

## उपक्रम

१) कथाअभिवाचन, कविता वाचन

२) बालमित्रांसाठी:'संस्कार-यात्रा' : कथाकथन, कवितावाचन, संस्कार प्रबोधन इ.

**४) राज्यपुरस्कार:**

१) बालसाहित्य मराठवाड्याचे 'नव्यावाटा-नवे स्वरूप' (२००८-०९)

दि.के.बेडेकर बाल साहित्य समीक्षा पुरस्कार

## ई-बुक प्रकाशित

| | | |
|---|---|---|
| झुळूक (ई-कथा संग्रह) | शो पीस (ई-कथा संग्रह) | पियुचे स्वप्न (ई-बाल कविता संग्रह) |
| समजुतीच्या गोष्टी (ई-बाल कथा संग्रह) | | |

# काव्यक्रम


१) ती.................................................०८

२) मनभावन.........................................०९

३) टिपूर................................................१०

चांदणे...............................................११

४) न सांगताच सारे कळूनी आले.................. १२

५) गीत गाईन म्हणतो.............................१३

६) मन आतूरले रे.....................................१४

७) रहावत नाही म्हणून सांगतो......................१५

८) खूप वाटायचे.......................................१६

९) माझे प्रेम असे आहे..............................१७

१०) तरच...............................................१८

११) तू सांग बरे..! .....................................१९

१२) भेट तुझी नाही, नाही तर, नाही!................२०

१३) असेच होते दरवेळी...............................२१

१४) सांगु सखे काय तुजला............................२२

१५) तुझ्यासाठी झाले वेडे..............................२३

१६) सोबतीस तू असतांना ...........................२४

१७) तो रस्ताही मज आता दुरावला.................२५

१८) पुन्हा-पुन्हा ..! ......................................२६

१९) आठवण तुझी..! ..................................२७

२०) गुलाब कळी........................................२८

२१) ऋतुराज वसंत......................................२९

२२) यश-अपयश..........................................३०
२३) व्यवहार आणि मन..................................३१
२४) विनाकारण असेच...................................३२
२५) सारेच किती कठीण................................३३
२६) दगड काळीज........................................३४
२७) जिव्हाळा..............................................३५
२८) बाजार..................................................३६
२९) शिल्लक ती कोरडी हवा..........................३७
३०) तुमचा आमचा पाऊस.............................३८
३१) नजरेचे धोके सगळे................................३९
३२) तुला म्हणून सांगतो आज.........................४०
३३) सांज ही, न सांगताच मावळून गेली............४१
३४) मनी वसे ते स्वप्नी दिसे............................४२
३५) मन आपले..! .......................................४३
३६) जीवनगाणे ...........................................४४
३७) या मैफिलीत.........................................४५
३८) मित्राविना............................................४६
३९) मनात कविता असते ..............................४७
४०) रंग जीवनाचे ........................................४८
४१) काठावरी पूर आठवणींचा.........................४९

## ९) ती

ती आल्याचे कळते
रोम रोम मनाचा फुलतो
सरूनी जाते रात्र अंधारी
लखलखित पहाट होते।।

आवाजात गोडवा तिच्या तो
तृप्त-मधुर अन छानसा
स्निग्धसे भाव नजरेतले
दाखवी  नयनांचा आरसा।।

सुंदरशी छबी तिची सदा
नजरेसमोरच की असते
जावो कधीही कुठे ती आता
मनात कायमची असते।।

स्वरात तिच्या जीवनगाणे
नित्य झंकारत की असते
सोबत तिचे असे असणे
जगण्यातले जगणे असते।।



# २) मनभावन

चिंब चिंब भिजवून गेला

तो पाऊस मनभावन होता।।

उन्हाची कठोर ती काहिली

धरती सारी शिणून गेली

नखशिखांत तृप्तीचा दाता

तो पाऊस मनभावन होता।।

विराण झाल्या होत्या बागा

कोरड्या ठाक झाल्या त्या सरिता

मुक्त मनाने कोसळणारा

तो पाऊस मनभावन होता।।

तुझ्यासवे पावसात फिरणे

पाऊस हवाहवासा होता

चिंब चिंब भिजवुनी गेला

तो पाऊस मनभावन होता।।



# ३) टिपूर चांदणे

टिपूर चांदणे आकाशीचे
नजरेने तुझ्या बघतो
हस्ती बघ चांदण्या अन
चंद्र तोही सोबत हसतो।।

गुंफुनी हाती, हात नाजूक ते
मस्त फिरलो चांदण्यात ते
रस्त्यानेच त्याच, आज फिरतो
धुंदीत माझ्या मस्त चालतो।।

प्रतिमा समोरची बघता
मनोमन मोहोरूनी जातो
आठवणी चांदण्या रात्रीच्या
गोड गाण्यात त्या आठवतो।।

प्रीतीची ठेव अनमोल सारी
अनवट खरी, तरीही भारी
सांभाळू आता दोघे आपण
दे शब्दा तुझा, शब्द माझा देतो।।

# ४) न सांगताच सारे कळूनी आले..

कालच्या भेटीत दोन डोळे बोलले

न सांगताच सारे गळूनी आले...!!

आकाशीचे चांदणे ते सोबत होते

मंद वारे खुशीत मधुर गात होते

मनास आनंदाचे उधाण आले

न सांगताच सारे कळूनी आले...

सागर किनारी वाळूत उमटले

तुझ्या नाजूक पावलांचे ते ठसे

खुलता गाली स्मित नाजुकसे

न सांगताच सारे कळूनी आले...!

घर दोघांचे आता तू सजवले

स्वप्न गोड सारे आता सजले

मनातले गुपीत तुझ्या सखये

न सांगताच सारे कळूनी आले...!!



# ५) गीत गाईन म्हणतो

वेळ असेल तुला आज तर गीत गाईन म्हणतो
नवे जरी सर्वांसाठी ते, तुझ्या ओळखीचेच म्हणतो
गाणे एक तुझे माझे काल होते, तेच आज म्हणतो
नवे जरी सर्वांसाठी ते, तुझ्या ओळखीचेच म्हणतो..।। १।।

विसरलीस जरी क्षण सारे, अजुनी मी आठवतो
शब्द न शब्द फुलापरी मनात, सारे ते साठवतो
बदलतात माणसे अचानक, मी हे ऐकून होतो
काय उणीव दिसल्या तुजला, विचार करीत होतो..।। २।।

शब्द आपुले, संगीत त्यातले, एकरूप दोघे होतो
बेसूर होता सुरावट सारी, मी एकटाच झालो होतो
तेच गीत तेच गाणे आज मी पुन्हा एकदा म्हणतो
नवे जरी सर्वांसाठी ते, तुझ्या ओळखीचेच म्हणतो।। ३।।



# ६) मन आतुरले रे..

रिमझिम रिझिम सावन आला रे सख्या
ये लवकरी, मन आतुरले रे तुज भेटाया..।। धृ।।

विरहाचे दिवस संपले कसे आपले
आठवणी त्याच्या आता काढू नको या
त्या एकल्या रात्री आता रे संपल्या
ये लवकरी, मन आतुरले रे तुज भेटाया..।। १।।

सरले एकदाचे रे क्षण दुराव्याचे
मनी रंग भरले रे गोड मीलनाचे
ओढ जाणुनी मनाची माझ्या सख्या
ये लवकरी, मन आतुरले रे तुज भेटाया ।। २।।

सहवासे अधिक रंगते प्रीती मनाची
विरहाने वाढते खरी खुमारी प्रेमाची
जाणुनी घेऊ आपण दोघे अर्थ सख्या
ये लवकरी, मन आतुरले रे तुज भेटाया...।। १।।

# ७) रहावत नाही म्हणून सांगतो..

प्रेम करतो तुझ्यावर मी
सांगायचे मजला असते
ठरवतो मनात कितीदा
ते मनातच राहून जाते।।

महती प्रेमाची काय सांगणे
कवी-शायरांचे हेच गाणे
प्रेमाचा स्पर्श मनास होता
सुंदर मनाचा माणूस होणे।।

नजरेतून बोलता मी तुला
समजत असेल ना तुला
बदलून जाते सारे काही
अर्थ प्रेमाचा कळे मनाला।।

रोज उगवतो दिवस नवा
आला तसाच निघुनी जातो
प्रेम करतो तुझ्यावर मी
राहवत नाही म्हणून सांगतो।।

## ८) खूप वाटायचे

कविता लिहितांना खूप वाटायचे
एक कविता खरोखरच
आपल्याही रूक्ष जीवनी यावी
अलगद मग सामावून जावी....!

शब्द-योग एक छानसा तो
अवचित वाट्यास आला
कवितेला तुझ्याच एका त्या
प्रतिसाद मला ही देता आला....!

समजून घेईल कविता अशी
रसिक-सखीच तू भेटली
भावली कविता तुझ्यातली
मनात जी हळुवार शिरली ....!

दोन मने आता ही जुळली
काय म्हणशील या भावनेला?
आवडतेस तू, तुझी कविता
छानसे उत्तर दे, या कवितेला....!

# ९) माझे प्रेम असे आहे

असतील सांगणारे तुज

प्रेम तुझ्यावर खूप आहे

शब्दातून सांगणार नाही

माझे प्रेम हे असे आहे।।

मनातून उतरण्या पेक्षा

मनात भरावे ग कधीही

मज व्यक्त होणे वाटे स्वस्त


अव्यक्त प्रेम हे असे आहे।।

मने जुळतात दोन जेव्हा

तेव्हा आपले कुणी वाटते

जिव्हाळा असतो जो मनात

तेही प्रेम, हे असे आहे।।



एकांती निरामय मनाला

प्रेम आधार देणारे आहे

मी ही आधार असेन तुझा

माझे प्रेम हे असे आहे।।

## १०) तरच....!

मी ही करू शकेन

सर्व काही मनापासून

'ओळखेन'ही मनातले

सर्व काही,

करेन आनंदाने-

सगळयांच्या आनंदासाठी !

पण .......

घाबरू नकोस,

हा.. 'पण', घाबरवून टाकणार नाही

तू देखिल ओळखावेस

मनातले 'माझ्या'

अन आनंदाने करावे

माझ्यासाठी,- सगळयांसाठी,

तरच.......

आनंदच आनंद पसरेल

घरात 'आपल्या'.....!

## ११) तू सांग बरे.....!

अंगणी या, रांगोळया शब्दांच्या रेखाव्या,

शब्द तुझे, भाव-भावना त्या खुलाव्या

एकांती असता तू संध्या समयी कधी

मनात त्या व्याकूळ आठवणी याव्या..।।१।।

उत्कट प्रतिबिंब मनाचे दिसेल का

गीत गोड शब्दरूपात करशील का?

सरोवर हे मनाचे, पाहता तू जरी,

काय दिसले तुज, ते मज सांग तरी.....।।२।।

सुंदर चित्रात आता रंग भर बरे,

सांग भासे कसे सखे, हे चित्र तुज खरे.....!

प्रेम असे जादू भरे, मना तू सांग बरे

आवाज देईन मी साद तु देशील बरे..।।३।।

## १२) भेट तुझी नाही? नाही तर, नाही ....!

अनोळखी तू, तरीही

ओळखीचीच वाटली

कुणास ठाऊक मग

भेटण्याची ओढ लागली...!..।।१।।

मी भेटीस दरवेळी

चार शब्द तुजसाठी

सुंदर फुले आणली

खोटी स्तुती का वाटली...?....!।।२।।

तुझ्यात काय चांगले

तुलाच खबर नाही

हेच सांगितले न मी

विश्वास तुजला नाही...!....।।३।।

भेटणे एकमेका हे

असे प्रेमच नेमके

मैत्री असेल सुंदर

असे का वाटत नाही?....।।४।।

योगायोग हा छानसा

भेटीचा नेहमी मनिला

आग्रह तरीही नाही

भेट तुझी नाही? नाही तर नाही...!....।।५।।

# 93) असेच होते दरवेळी.....!

खूप बोलायाचे तुजला
ठरवतो मनाशी माझ्या
समोर येता शब्द नाही
असेच होते दरवेळी....!

समजून आहेस सारे
ठेवतेस चेहरा कोरा
आणि माझा गोरामोरा
असेच हाते दरवेळी....!

का असे तुझे हे वागणे
अन स्वप्नात येणेजाणे
हसण्यात मी विरघळणे
असेच होते दरवेळी....!

नजरेतले तुझ्या सारे
ओठी येऊनी का थांबते
आतुरता संपेना अजुनी
असेच होते दरवेळी....!

## १४) सांगू सखे-काय तुजला

सांगू सखे काय तुजला मी
हाल माझ्या मनाच ते कसे?
होता नजरा-नजर तुझी
कळेल, माझे मन ते कसे ...!

स्वप्नात असतेस तू, अन
सत्यात पाहतो तुजला
अस्तित्व तुझे, जग ते माझे
एवढे आहे ठावे मजला...!

ओंजळीत आलो घेऊन मी
उमलत्या फुलांचा गजरा
दिसतेस किती सुंदर तू
खुले रंग निळा हा साजरा...!

म्हणतेस सदाच तु मला
होतेसे काय या पाहण्याने?
जीवन लाभते दरवेळी मला
सखे, तुझ्या एका पाहण्याने...!

## १५ । तुझ्यासाठी झाले वेडे

मरगळलेले हे मन माझे
तुज भेटण्यासी होई वेडे
धावत निघते तुझ्याकडे
वेडे, तुझ्यासाठी झाले वेडे...!

सुगंधी झुळूक ती हवेची
चाहूल असे तू येण्याची
सोडण्यास गुलाबी कोडे
वेडे, तुझ्यासाठी झाले वेडे...!

दोन म जुळून येता अन्
जगण्याचा मोह जादा होता
प्रीत चांदणे मनात पडे
वेडे, तुझ्यासाठी झाली वेडे....!
हसू नकोस अशी बघुनी

नजर तुझी वेगळीच बोले
मनास माझ्या सांभाळ आता
वेडे, तुझ्यासाठी झाली वेडे....!

## १६ । सोबतीस तू असताना

जग सारे सुंदर दिसते
सोबतीस तू असतांना
रस्ता हा सहज सुलभ
सोबतीस तू असतांना।।

करीन सामन तरीही
मी आलेल्या संकटांचा
विश्वास असतो माझ्यात
सोबतीस तू असताना ।।

सुटले नाहीच कुणीही
इथे दुखाच्या भोगातुनी
झळा भासती शितल मज
सोबतीस तू असताना ।।

घेतास हात, हा हाती तू
सावली झालीस तू माझी
जगणे आनंद गाणे आता
सोबतीस तू असतांना।।

## १७ | तो रस्ताही मज आता दुरावला

दुरावलो तुज पासूनी ज्या समयी

किती यातना त्या जाहल्या मनाला

चाललो रस्त्याने सोबत आपण

तो रस्ता ही मज आता दुरावला ।।

त्या एका संध्याकाळी तूच तर

प्रेम ते आहे किती हे सांगितले

जीव कानात आणुनी अन मी ऐकले

नि, हात हातात तू माझा घेतला ..।।

एका सकाळी अचानक मग एक

वावटळ गैर समजाची आली

वादळात त्या, शब्द तुझा विरला

तो रस्ता ही मज आता दुरावला..।।

## १८ । पुन्हा-पुन्हा ..

नको तेच झाल ना शेवटी

रोजच्या प्रमाणे नाही आलो

तर चक्क अबोल, वरती

रूसलीस, गेलीसच शेवटी..

एरवी, धडाधड बोलत सुटणारी तू,

हे मशीनगन, एकदम शांत शांत..।।

किती वेगळी वाटेस तू

सॉरी,

आणिक रागावू नकोस तू..।।

बघ,

तुझ्या टपोऱ्या डोळयातील

मिश्कील अनुरागाने

शिक्षा सुनावलीय मला

रोज रोज स्वप्नात येण्याची .....

हुजूर, मान्य आहे माझा गुन्हा

कबुलीनामा हा देतोय पुन्हा

रोज भेटणार मी खरच पुन्हा

आता हसा की छान पुन्हा-पुन्हा..।।

## १९ | आठवण तुझी..

आठवतो तुजला मी सखे

दिवसाच्या साऱ्याच प्रहरी

पहाट जाते आठवण्यात

रात्र सरते अशीच सारी..।।



सकाळी पाहता तू दिसते

उमलत्या सुंदर फुलापरी

वावरतेस भोवती माझ्या

भासतेस जशी स्वप्नपरी..।।

रंग गुलाबी गाली तुझिया

भाव खट्याळ दिसती डोळा

भान हरपुनी बघत राही

रंग साडीचा हा मस्त नीळा ..।।

## २० | गुलाब कळी

सुंदर प्रहरी रोज सकाळी

भेटते मज एक गुलाब कळी

मन कोवळे-भावना कोवळी

शब्द तिचे गुलाब पाकळी ..।।

ती भेटे, सकाळ उमलते

गात्रात चैतन्य पसरते

इंद्रधनू मनी आकारते

रम्य अशा त्या गोड सकाळी ..।।



थांबवत म्हणे ती मजला

सोबत राहू दे रे मजला

नवी उमेद-नव्या प्रेरणा

मनापासून देईल तुजला..।।

आहेस कोण? तू सांग मजला

न चुकता का भेटशी अशी?

खळखळून हसत म्हणे ती

समज तुझी प्रतिभा कळी ...।।

## २१ | ऋतुराज वसंत

वसंत ऋतुस म्हणती ऋतुराज सारे
आगन होता अवनीवर याचे
निसर्गरूप बदलून जाई अवघे
वसंत वैभवे दिपुन जाती सारे ..।।

शिशिराच्या पानगळीने रूक्ष होता
परिसर भवतालीचा हो हा सारा
उजाड झाले होते डोंगरमाथे अन
रानोमाळ ही रखरखीत होते सारे....।।

चैत्र-पालवी हा शुभ संकेत जणू
वसंत  नवलाईचा नि नव उन्मेषाचा
धरणीस खुलवणाऱ्या नव बहराचा
ऋतू असे एक बहारीचा या वसंताचा ..।।



## २२ । यश-अपयश

अपयशच लागता हाती
मनास वेदना फार होती
मेहनत करून शेवटी
काहीच नाही लागत हाती..।।

पराभवाचे दुखः मनाला
सहन करावे की लागते
अपमानाचे जहर सारे
चुपचाप गिळावे लागते..।।

यशाची गणिते, गृहीतके
कुणी कुणा सांगत नसतो
अपयशाचे माप मात्र जो तो
पदरी आपल्या टाकून जातो..।।

यशाचा झगमगाट पाहणे
आवडे सर्वांनाच नेहमी
अंधारी कुढत बसणे हे
अपयशाच्या असे नशिबी..।।

आधाराचा शब्द आपुला
आपणहून जर दिला
मिळेल उमेद त्या एकाला
पुढचे पाऊल टाकायला..।।

# २३ | व्यवहार आणि मन

मन असते हळवे नि खुळे
डबडबती कशानेही डोळे
नाही येत बेगडी व्यवहार
रहाते तसेच दुधखुळे..।।

कुणीच नसतो कुणाचा कधी
लक्षात येत नसते आधी कधी
अर्ध्या प्रवाही सोडता कुणी
शहाणपण येते कधी कधी..।।

भाव-भावना या सगळ्यांची
किंमत शून्य पैशाच्या जगात
सोसावे लागतात मग तडाखे
उन्मळते मन हे कधी कधी ..।।

आपण आपले एक करावे
येईल समोर, सामोरे जावे
येता आधाराला कुणी कधी
नशीब आपले, बरे समजावे ..।।

## २४ | विनाकारण असेच

विनाकारण असेच
शून्य होई का हे मन?
टाकून बसते मान
मलूल त्या फुलापरी..।।

रोजचेच जिणे सारे
भारवाही झाले खरे
खांदे दोन्ही झुकले
बळ नाही पहिल्यापरी..।।



चित्तात समाधान हे
नाही मुळीच राहिले
मिळवावे किती किती
भाव ही ना राहिले..।।

हुरूप मनासी येण्या
काय करावे हो आता?
नवी उमेद, नवी अशा
कुणी जागवावी आता..।।

# २५ | सारेच किती कठीण

दुःख लपवूनी जगणे
खरेच कठीण असते
चेहरा दिसेल हसरा
नजरेत वेदना बोलते..।।

शब्द वापरू जरी तोलून
भरवसा नाही त्यातून
कुणी सोयीचा काढुनी अर्थ
साधितो त्यातुनी तो स्वार्थ..।।



लोक जरी देतात इशारे
समजुनी घेणे कठीण
कोण खरे आणि कोण खोटे
उमजणे खरेच कठीण ..।।

## २८ | दगड काळीज

छद्मी चेहेऱ्यावरी त्यांच्या

लुटण्याची सदा भावना

कफल्लक करून टाकीती

नसे त्यांना जराही करूणा..।।

स्वार्थापोटी इतके असे

निगरगट्ट कसे जाहले

लोक परकेच इथले

कुणीच नसे आपुले..।।



मना निराशेने वेढता

अवघे सारेच संपले

दगड काळीज जगात या

नसे कुणी आपुले..।।

## २७ । जिव्हाळा

दुनिया अनोखी सारी
लोक अनोळखी सारे
ओळख होता जरासी
सोबती होतात सारे..।।

माणसे सदा भुकेली
या एकाच भावनेची
लावता जीव याना हो
जीवा जीव देती सारे ..।।

पैशाने काही खरेदी
कधी आपलेपणाची
प्रेम द्यावे-प्रेम घ्यावे
व्यवहार सोपे सारे ..।।

गरगरून जावे अशी
आहे स्थिती आज जरी
दुरावल्या माणसांना
आता पुन्हा जोड्या रे ..।।

# २८ । बाजार

बाजारात गेलो मी देखण्या । चक चकाट कसला होता.. ।

घेऊनी गेलो पैसे मी खरे । माल तिथला फसवा होता .. ।।

माणसांची गर्दी तुडुंब ती। पैश्यांचा खण खणात होता .. ।

बेगडी सारे चमकते ते। मुखवट्यांचा ताटवा हाता .. ।।

डोळे भिरभिरते सगळे। पाहणाऱ्यांना सोस होता .. ।

विकण्यासाठी काय नव्हते? । जो-तो चमचमता काजवा होता.. ।

भावना घेऊनी मनातल्या। कुणी आलाच चुकून येथे.. ।

कवडीची ना किमत त्याला । दलालांचा तो कालवा होता .. ।।

# २९ | शिल्लक ती कोरडी हवा

आता न कोणती जवळीक इथे, आहे तो फक्त दुरावा
हवामान बदलते बेटे, शिल्लक ती कोरडी हवा..।।

तुझ्या माझ्यातले आहे, ते सारे दोघांचे असते
नवलाईचे दिवस सरले, त्यासाठी आता पुरावा हवा..।।

अपेक्षांचे बागुलबुवा उभे, सदाच अवती भवती
कुणी दुखावले जाता, मग जाते जगण्यातली हवा..।।

अपेक्षांचे बागुलबुवा उभे, सदाच अवती भवती
कुणी दुखावले जाता, मग जाते जगण्यातली हवा..।।

तो आणि ती, भेटी अंती, सहजीवन ते होते सुरू
कुघोडी करण्याच्या स्पर्धेत, कुणी कशाला हवा? ..।।

सहवासाचे सुरेल गाणे, गाण्याचे ते राहून गेले
वितंडवाद उरले केवळ, त्याला कशाला सूर हवा..।।

जगण्यातली गम्मत सरली, भाव सारे विरून गेले
फुले मनाची ती कोमेजली, उसना वसंत कुणास हवा..।।

# ३० | तुमचा आमचा पाऊस

क्षितिजा काठी तो दिसता
खिडकीशी मीही थबकलो
निळयाशार अंबरी जमल्या
घन निळया मित्रांना पाहतो..।।

पावसाच्या दूतांना पाहुनी
या या मित्र हो, मी विनवितो
घेत नाही मग आढेवेढे तो
आणि मनमुराद कोसळतो..।।



मित्र असे मोकळे असावे
आत-बाहेर काही नसावे
देणे पावसापरी जमावे
जीवनी सुख होऊनी यावे..।।

## 39 | नजरेचे धोके सगळे

नजरेचे धोके सगळे
सारखेच दिसे सगळे
कोणते खरे-काय खोटे
नजरेचे धोके सगळे ..।।

बुद्धी नी भावना यांची
सहमती नसते कधी
दोन मते दोन दिशा
असेच हे घोळ सगळे..।।

भेटती जे व्यवहारी
त्यांचे सारेच निराळे
बोलणे-वागणे वेगळे
नजरेचे धोके सगळे..।।



इमान हरते येथे
चलती बनवेगिरीची
दिसते तसे नसते
नजरेचे धोके सगळे..।।

# ३२ । तुला म्हणून सांगतो आज

बोल रे एकदा तू तुझ्याशी
तुला म्हणून सांगतो आज
गुदमरते मन आता तुझे
तुला म्हणून सांगतो आज..।।

लोकांना दे आनंद नेहमी
हे तर छानच आहे नेहमी
लक्ष दे कधी स्वत:कडे
तुला म्हणून सांगतो आज..।।



गुळाच्या ढेपी भोवती सदा
मुंगळे गर्दीने गोळा होती
तशी अवस्था तुझी रे आज
तुला म्हणून सांगतो आज..।।

त्यागाची ओसरता धुंदी ती
जाणवेल - तू चुकलास कुठे?
ज्यांचे केले भले-ते गेले कुठे?
शांतपणे विचार कर आज ..।।

## 33 | सांज ही, न सांगताच मावळून गेली

वेळ सारी ती केव्हाच निघुन गेली
लाट अकस्मात आली विरून गेली
समुद्राच्या काठी तसाच तिष्ठत तू,
सांज ही, न सांगताच मावळून गेली..

हातात जरी नसे कधी काही आपुल्या
परक्या सावल्या ही होती की आपुल्या
वीज ती आली अन डोळे दिपवून गेली
सांज ही, न सांगताच मावळून गेली..

सोबतीची सवय मानसी ती होते
मनात अलगद मन गुंतुनी जाते
पायवाट सोबतीची हरवून गेली
सांज ही, न सांगताच मावळून गेली..

## ३४ । मनी वसे ते स्वप्नी दिसे

मन आपले असे कसे?
विचारू नका हो हे असे
जितुकी माणसे भोवती
तितुकी मने वेगळी असे.. ।। १।।

रंगुनी जाणे स्वप्नात हा
छंद मनाचा आवडता
मनात मग जे रेंगाळे
मनी वसे ते स्वप्नी दिसे.. ।। २।।

वास्तवातील जगणे हो
परीक्षा मनाचे रोज असे
श्रांत होण्यासाठी बिचारे
स्वप्नी आनंद शोधीतसे.. ।। ३।।

सुखाच्या शोधात निघता
मृगजळ दिसे ठायी ठायी
निराशा घेरूनी टाकी मना
त्या स्वप्न उभारी असे.. ।। ४।।

## ३५ । मन आपले..

काय अवचित झाले मना
झाकोळून येती भावना
धो धो बरसून जाईना
मन मोकळे होईना.. ।। १।।

भोवती आपलेच तरीही
परकेच वाटावीत सारे
बोलणे वरवरचे त्यांचे
हसणे फसवे वाटणारे .. ।। २।।

सावट गडद सारे किती
मनावरती आता दाटले
निचरा होण्या साऱ्यांचा
पावसाने यावे वाटले.. ।। ३।।

आपणच आपल्या मनाशी
कधी आपणच आपल्या मनाशी
कधी कधी जरूर बोलावे
गुंतू नये कुणात कधीही
मनास जरूर शिकवावे.. ।। ४।।

## ३८ | जीवनगाणे

हे असे जीवनगाणे, अशी जीवन कहाणी
जीवनगाणे वाटे जणू अळवावरचे पाणी.. ।।१।।

मनात जिद्द अनोखी, वेडी तरी भोळीभाबडी
हारणे कधी मंजूर नसते, जिंकण्याची आवडी
हे असे जीवनगाणे, अशी जीवन कहाणी
जीवनगाणे वाटे जणू आळवावरचे पाणी .. ।। २।।

विसरणार नाही कधी, ती तुझी रे लढाई
घनघोर आवेग तुझा, तू भासे एक शिपाई
हरने अप्रिय तुजला, मज प्रिय विजयकहाणी
जीवनगाणे वाटे जणू आळवावरचे पाणी .. ।। ३।।

वास्तवात नसे आता जरी अस्तित्त्व तुझे
स्मृतीत चिरंतन असते पूजन तुझे
आठव होतो तुझा अजुनी नयनी येते पाणी
जीवनगाणे वाटे जणू आळवावरचे पाणी .. ।। ४।।

हे असे जीवनगाणे, अशी जीवन कहाणी
जीवनगाणे वाटे जणू आळवावरचे पाणी .. ।।

## ३७ | या मैफिलीत

मैफिलीत देखण्या या मोठा थाटमाट आहे
मी दूर उभा बरा, नुसता झगमगाट आहे ..।। १।।

सुंदर गर्दीत एक नक्की जाणवते आहे
जवळचे असुनी सारे, दूरचे भासत आहे.. ।। २।।

लपवूनी चेहेरा स्वत:चा जो तो वावरतो आहे
दुसऱ्याला उघडे करण्यात आनंद मानतो आहे..।। ३।।

कमनीय कामिनी त्या, जणू सौंदर्य दामिनी
नजरेच्या मोहक अस्त्राचे मादक युद्ध आहे..।। ४।।

संघर्ष इथे नाहीतच असे मात्र मुळीच नाही
छुपे डावपेच लढण्यात हरेक तरबेज आहे.. ।। ५।।

हळवी मने-मुग्ध भावना याना मनाई आहे
पैश्याच्या दुनियेत या, याचे काय काम आहे? ।। ६।।

कोऱ्या चेहेऱ्याने कोपऱ्यात केव्हाचा उभा आहे
पहाणाऱ्यासाठी बिनकामाचा फ्लॉवरपॉट आहे.. ।। ७।।

मैफिलीत देखण्या या मोठा थाटमाट आहे
मी दूर उभा बरा, नुसता झगमगाट आहे ..।। ८।।

## ३८ । मित्रांविना

अर्थपूर्ण बनविती आयुष्याला
नशीब लागते साथ मिळायला
रंगत नाही येत कधी यांच्याविना
जिंदगी भासते फिकी या मित्रांविना..।। १।।

एकट्याने जगणे नसावे हो कधी
मैत्रीची बाग असावी सुंदर साधी
फुले जशी नाना तऱ्हेची, तसे मित्र नाना
जिंदगी भासते फिकी या मित्रांविना ..।। २।।

उत्तुंग-उदात्त मैत्रीचे दाखले किती
जगभरातले मित्र आपल्यास देती
मैत्री कृष्ण-सुदाम्याची, पार्थ-कान्हाची
हृदयंगम मैत्री-नाते, त्यातील भावना
जिंदगी भासते फिकी या मित्रांविना..।। ३।।

## ३९ | मनात कविता असते

मनात माझ्याही खूप काही
नित्य असे साठुनी राहते
ओठी येते बोलण्यासाठी ते
निशब्द होऊनी आत जाते
उफाळूनी येते पुन्हा अन
कविता होऊनी समोर येते..।। १।।

कवितेचे असे येणे तसे
नसते सहजतेचे कधी
पहावी लागते वाट आधी
सुचते नि येते कधी कधी ..।। २।।

वाटते कधी कधी जमावे
लिहिणे कविता इतरांपरी
नंतर उमजते, असे नसते
प्रत्येकाची कविता असते..।। ३।।

प्रतिमा आणि प्रतिभा दोन्ही
असतात मनाच्या तळाशी
'स्व' ला ओळखायचे असते
तीच आपली कविता असते..।। ४।।

## ४० | रंग जीवनाचे

रंग जीवनाचे हे, रोज कितीदा पाहिले
पाहुनी रंग परी, मन रितेच राहिले..।।

तजेलदार रंगाने मन उमलून जाई
आवडीचे भेटता सहज मिसळून जाई
विघ्नसंतोषी एकाने विस्कटून हे टाकले
रंग जीवनाचे हे, रोज कितीदा पाहिले..।।

पाऊलवाटेवर काटे का पसरती लोक?
काटेरी शब्दांनी का पाडती मनाला भोक?
आधार देणे मनासी ते तर दूरच राहिले
रंग जीवनाचे हे, रोज कितीदा पाहिले..।।

शेरास भेटे सवाशेर, हे विसरले गेले
भित्रे असतात सारे, गृहीत धरले गेले
जिगरबाज भेटता, चित्र हे बदलून गेले
रंग जीवनाचे हे, रोज कितीदा पाहिले..।।

रंग जीवनाचे हे, रोज कितीदा पाहिले
पाहुनी रंग परी, मन हे रितेच राहिले..।।

## ४१ | काठावरी पूर आठवणींचा


मन अवखळ पाण्यापरी कसे याला रोकू?
काठावरी पूर आठवणींचा, कसे याला रोकू ?


दाट काळोख कधी, कधी लख्ख चांदणे असते
कधी तलखी उन्हाची, कधी चिंब वर्षा असते
उधाण येता मनास मग, कसे याला रोकू
काठावरी पूर आठवणींचा, कसे याला रोकू?


भासे वर शांत शांत जरी, मनाचे हे तळे
काय खोल डोहात, हे कधी कुणा ना कळे
प्रयत्न अपुरे पडता, वाटे शोध घेऊ शकू?
काठावरी पूर आठवणींचा, कसे याला रोकू?


मन अवखळ पाण्यापरी कसे याला रोकू?
काठावरी पूर आठवणींचा, कसे याला रोकू?


# आमची संग्राह्य व उपयुक्त प्रकाशने व ई-बुक्स

























## आगामी प्रकाशने

- जमीन मोजणी
- टेरेस गार्डन
- संत कान्होपात्रा अभंग गाथा
- प्रदूषण मुक्त घरासाठी

सप्तर्षी प्रकाशन ®

सप्तर्षी असोसिएट्स ॲण्ड पब्लिकेशन्स
गट नं. ८४/२, घुले नगर,
दामाजी कॉलेज पाठीमागे,
मंगळवेढा जि.सोलापूर -४१३ ३०५
email: saptarsheeprakashan@gmail.com
saptarsheeprakashan@rediffmail.com

ई-बुकसाठी लींक www.bookganga.com/saptarsheeprakashan